Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ६३(२) ] शनिवार, नोव्हेंबर २२, २०२५/अग्रहायण १, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८९.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**एटापल्ली शहराच्या प्रारुप विकास योजने मधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक कलि-बांध-नपंए-११५७-२०२५.—

ज्याअर्थी, नगर पंचायतीने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारुप विकास योजना एटापल्ली, पत्र क्रमांक ३३१, दिनांक १२ जून, २०२४ चे सूचनेद्वारे नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात नागपूर विभागीय पुरवणी भाग एक-अ, मध्ये दिनांक २७ जून ते ०३ जुलै, २०२४ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहित मुदतीत कुठलीही सूचना व हरकत प्राप्त नसल्याने उक्त अधिनियमाच्या २८(२) अन्वये नियोजन समिती गठीत करण्याची आवश्यकता नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर नियोजन प्राधिकरणाने ठराव क्रमांक ०४, दिनांक ०७ मे, २०२५ रोजीच्या ठरावान्वये एकूण ०२ बदल सुचविल्यानुसार सुधारणा करुन उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी मान्यता दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल/बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे;

आता, त्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदलांची/बदलांची सुची परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट "अ"**

**अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सूची**

| क्रमांक | फेरबदल/बदलांचा तपशील |
|---|---|
| (१) | (२) |
| **एम-१** | मौजा जीवनगट्टा, सर्वे क्र. ०१ वरील आरक्षण क्र. २२, बगीचा आरक्षणामधून वगळण्यात आले व रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| **एम-२** | मौजा एटापल्ली, सर्वे क्र. १९ वरील कृषीविभाग वगळण्यात आला व रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आले. |

सदर फेरबदल/बदल दर्शविणारा उक्त प्रारुप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

१. मुख्याधिकारी, एटापल्ली नगर पंचायत.

२. सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, गडचिरोली.

(अवाच्य),
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, एटापल्ली.

एटापल्ली :
दिनांक २० नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९०.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Publication of list of Modifications/Changes in Draft Development Plan of u/s 28 *(4)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. Kali-Const.-NPE-1157-2025. —

Whereas, Etapalli Nagar Panchayat, being Planning Authority, has published the Draft Development Plan Etapalli u/s 26 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* letter No.331, Notice dated 12th June, 2024 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Nagpur Division, Supplement Part 1-A, dated 27 June to 03 July, 2024.

And whereas, as there are no suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee has not Sconstituted u/s 28*(4)* of the said Act;

And whereas, under section 26*(1)* of the said act, the Planning Authority has suggested total 14 modification and approved by Resolution No. 04, dated 07th May, 2025 the Draft Development Plan to be submitted to the Government for approval as per section 30 of the said act;

And whereas, it is necessary to publish the said modifications/changes made in the said Plan for inspection of the public as per section 28*(4)* of the said Act;

Now, therefore, the list of modifications/changes made u/s 28*(4)* of the Act, by the said Planning Authority is hereby published as Appendix-A as per the provisions of said Act for information of the public.

APPENDIX-"A"

**List of modifications/changes made u/s 28(*4*) of the Act**

| No. | Details of Modifications/changes |
|---|---|
| (1) | (2) |
| **M-1** | The Reservation No.22, Garden on Survey No.01 at Mauja Jivangatta is deleted & included in Residential Zone. |
| **M-2** | The land under Survey No.19 at Mauja Etapalli is excluded from Agriculture Zone & included in Residential Zone. |

The said Draft Development Plan showing the modification/changes is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days.

1. The Chief Officer, Etapalli Nagar Panchayat.
2. Assistant Director, Town Planning, Branch Office, Gadchiroli.

(Illegible),
Chief Officer,
Nagar Panchayat, Etapalli.

Etapalli :
Dated the 20th November, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.